जा.क्र.प्रा/प्राशि/मान्यता/खाजगी/९६-९७
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे १ यांचे कार्यालय,
दिनांक 20 JUN 1997

प्रति,
शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद, पुणे

विषय:- सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ:- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक व्हीएल९५.१०९६ (५५३)प्राशि-दिनांक ३०.१०.९६ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधीन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला
तीच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९९६पासून इयत्ता १ ली ते
सन १९९६-९७च्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरू असलेल्या वर्गासह प्रत्येकी एक तुकडीस प्राथमिक
शाळा सुरू करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे नाव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| 1 | दि येरवडा मारथोमा सेंटर थॉमस् केलापर मेयवनगर धानोरी ता. हवेली | इमॅन्युअल मारथोमा प्राथ.स्कूल धानोरी ता. हवेली | १ ली पासून | इंग्रजी |

२.१ सदर संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहीजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल,स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२.३ शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या आधिन राहून नेमला पाहिजे.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा,व्यवस्थापन,विषयक सुविधा शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम,पाठ्यपुस्तके,मूल्यमापन पध्दती,शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयेत केले पाहिजे. व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

२.६ संस्थने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्यावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशिरपणा नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

..२..

-२-

२.८ संस्थने परवानगीसाठी विहित केले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणता ही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने/ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रीय अधिका-याकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करुन घेऊन मगच संस्थेला नगणगी शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावीश.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारची गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे [ यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा. ]

७] शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८] शासनमान्य वेतनश्रेण्यानुसारच शाळेतील मान्य शिक्षकांना वेतन देणे आवश्यक आहे त्याबाबत तक्रारीस वाव देण्याची वेळ येता कामा नये या अटीवर मान्यता देणेत येत आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा.

स्वाक्षप्रतिवर शि. उ. सं. यांची
सही वरी

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १.

प्रत :- प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका
शिक्षण मंडळ, ---------- जिल्हा ---------- यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- मा. सचिव,
दिघी येरवडा आरथोना डेरर थामस क्लेवापर मेरवगार
यांना माहितीसाठी अग्रेषित. धानोरी, ता. हवेली, जि. पुणे